# मौल्यवान आठवणी - भाग ३

सकाळी उठले. घड्याळांत पहाते तर काय, सकाळचे सात वाजले होते. अरे ह्यांनी उठवलेच नाही मला. रात्री लीनताने बराच त्रास दिला होता म्हणूनही कदाचित उठविले नसेल. असा विचार करीत अंगावरचे पांघरुण बाजूला केले. आणि लिव्हींगरुममध्ये लीनताच्या क्रिबकडे एक नजर टाकली. बाईसाहेब मस्त झोपल्या होत्या. मी मनाशी पुटपुटले, हे छान आहे तुझं. रात्रभर आईबाबांना त्रास द्यायचा आणि दिवसभर झोप काढायची. आतां परत एकदा वाचायला पाहिजे आमचे डॉ. स्पॉक काय उपाय सांगतात ते. तशी मला कल्पना आहे त्यांच्या ह्यावरील मताची. पण परत एकदां वाचून खात्री केलेली बरी. आतां आई असती येथे तर त्या स्पॉकला मी सुट्टीच दिली असती. आईच्या आठवणीने मन एकदम खट्टू झाले. भारतांतील बाळंतिणी किती नशीबवान् असतात. सातव्या महिन्यांत माहेरी जायचे. मस्त डोहाळजेवण, दहा दिवस हॉस्पिटलमध्ये रहायचे, मग बाळ पांच महिन्याचे होईपर्यंत मस्त माहेरी रहायचे. रोज भरपूर तेल लावून मसाज्, मग तेल मुरु द्यायचे थोडावेळ मग आई मस्त आंघोळ घालते, नंतर गरम गरम शेक घ्यायचा बाजेवर झोपून. तोपर्यंत बाळाची काळजी घरातले मी तू, मी तू करीत घेणार. बाळाचा मसाज्, आंघोळ, कपडे वगैरे आई किंवा एखादी बाई लावली असेल तर ती करणार. ह्या सगळ्या प्रयासानंतर बाळ मस्त झोपणार. काय मजा आहे बाळंतिणीची भारतांत. नाही तर येथे.......माझे मन भूतकाळांत शिरले.

मी की पंच ऑपरेटर म्हणून चेस मॅनहॅटन बँकेत काम करी. माझी निरनिराळी शिफ्ट असे. दर आठवड्याला जाण्यायेण्याच्या वेळा निराळ्या. त्यामुळे प्रत्येक शिफ्टमधील लोकांची माझी छान मैत्री जमली. भारतांतून येथे आल्यावर मी तीनचार महिन्यांतच तीन आठवड्याची की पंच ऑपरेटरची ट्रेनिंग घेतली. आणि टेंपररी जॉबच्या एजन्सीमध्ये माझे नांव घातले. एजन्सीने माझी टायपिंगची परिक्षा घेतली. की पंच म्हणजे एक प्रकारचे टायपिंगच. तेथल्या सेक्रटरीने मला तू घरी जा. कोठे व्हेकन्सी असेल तर आम्ही बोलवूच तुला. तुझे इंग्रजी मात्र मस्त आहे हं. तुला आम्ही लवकरच कॉल करु. मी विचार केला, ही बया सगळ्यांशीच अशी गोड बोलत असणार. हातांवरील घड्याळ जे काकांनी मुद्दाम आणून दिले होते ते पाहिले. काका म्हणाले होते, सुरेखा, तू आठवीत फर्स्ट क्लास आलीस तर माझ्या पुढच्या सिंगापूर ट्रिपमध्ये तुझ्यासाठी मी सिटीझन्स वॉच घेऊन येईन. काका भारतीय नेव्हीमध्ये चीफ कॅप्टन की कांहीतरी होते. शिपवर गेले की सहासात महिन्यांनीच परत भारतांत येत. माझा आठवीचा रिझल्ट आला. मी तळ्याजवळील सरस्वती मंदीरमध्ये शिकायची. माझी आई, तीन मावशा पण तेथेच शिकल्या. आईची क्लासमेट माझी हेडमास्तरीण. तू तुझ्या आईसारखी म्हणजे वत्सलासारखी हुषार आहेस की सौंदर्याच्या नांवाखाली वेणीचा एक फटका पुढे आणतेस आणि तो मागे करुन दुसरी वेणी पुढे आणतेस? मला हे फटक्याचे गणित कधी समजलेच

नाही. जाऊ दे. पण मी आठवीत साधी फर्स्टक्लास नाही तर फर्स्टक्लास फर्स्ट आले. चारपांच महिन्यापूर्वी काकांनी दिलेला शब्द. विसरले पण असतील. काका सिंगापूरहून माझ्यासाठी घड्याळ घेऊनच आले. मावशीने तर कळविले नसेल?

सकाळचे दहाच वाजले होते. मी विचार केला, अनायासे मी मॅनहॅटनमध्ये आलेच आहे तर आणखी दोनचार एजन्सीज् मध्ये नांव नोंदवू मग जाऊ घरी.  रिकाम्या घरी तर जायचेय. चार भिंतींत राहून कंटाळा आला होता. नाहीतरी हे घरी संध्याकाळी सातसात आठआठ वाजेपर्यंत  येतच नाहीत. समजा आलेच तर, वाट पहातील माझी. ती पण मजा (की सजा) चाखू दे ना ह्यांना. घरी यायला तीन वाजले मला. रश अवर सुरु होतो साडेतीन चारनंतर. त्याच्या आंत घरी पोहोंचले की झाले. मी घरांत आले आणि पहिल्या एजन्सीचा फोन वाजतच होता. अग, तुला मी किती वेळापासून कॉल करतेय. मी विचार केला, मी आणखी कांही एजन्सीजमध्ये माझे नांव नोंदवून आतांच घरांत येत आहे असे सांगावे कां? पण विचार बदलला. उगीच आपल्याच हांताने आपल्याच पायांवर धोंडा घातल्यासारखे नको व्हायला. पण आतां वाटतेय, एम्. बी. ए., फायनॅन्स केले म्हणून. आम्हांला शिकविण्यांत आले होते, सांगितले असते तर माझी मार्केटेबिलीटी वाढली असती. एनीवे, ती एजन्सीची बाई म्हणत होती अग तुझा रिझल्ट पाहून माझी बॉस खूप इंप्रेस झालीय. तिने इकडे तिकडे फोन लावून तुझ्यासाठी चेस मॅनहॅटन बँकेत नोकरी मिळविली. तू टेंपररी म्हणून अप्लाय केलास ना तर तुला बेनेफिस्टस् काहीच मिळणार नाहीत. ताशी तुला पगार मिळेल. जितके जास्त काम करशील तितका जास्त पगार. मला बेनेफिस्टस् काय भानगड आहे हे काही कळले नाही. पण ताशी पगार जास्त आहे ना मग करायला काय हरकत आहे ? तरी आईने सांगितल्याप्रमाणे हुरळून न जातां मी तिला म्हटलं, मला माझ्या नवऱ्याशी बोलावे लागेल प्रथम. उद्या फोन करुन कळवेन म्हटले. तरी बया मला सोडायला तयार नाही. तुझ्या टायपिंगच्या परिक्षेत ४५० स्पीड आहे तुझा. आणि फक्त दोन चुका. माझी बॉस म्हणते एवढा चांगला रिझल्ट तिने कधी पाहिला काय ऐकला पण नाही. उद्या नक्की फोन कर हं. वाटल्यास मी तुझ्या नवऱ्याशी बोलेन. त्यांना सांगेन, तू हिरा आहेस हिरा. मी म्हटलं मी बोलेन ह्यांच्याशी आणि नक्की फोन करीन. विसरु नकोस. नक्की फोन कर बर कां?. मी फोन ठेवला आणि  मनाशी म्हटले, हे अमेरिकन लोक खरचं मितभाषी. मी हवेंत उडत होते. चेसमध्ये नोकरी म्हटल्यावर हे नाही म्हणणार नाहीत. वरून भरपूर पगार. तेवढीच संसाराला मदत. हम भी कुछ कम् नही अशा चाईल्डीश भावनेने दिवसभरांतल सगळं ओकून टाकलं. पण हे मख्ख बसून होते. सबवेमध्ये रश अवरमध्ये खूप गर्दी असते. जवळपासच तू नोकरी पहा ना. मी म्हटलं, अहो भारतांत मी चर्चगेटवर स्पोकन अमेरिकन स्टाईल इंग्लिश शिकायला जायची रोज दादरहून. एकदां मावशीने दाखविले. झाले. माझी मीच रोज जाणंयेणं करीत असे. मावशी आणि काका माझ्यावर खूष हेते. आणि अमेरिकेत आल्यावर मी आणि लक्ष्मीने अमेरिकन स्टाईल स्पोकन इंग्लिशचा कोर्स केला ना. त्यावेळेस रश अवरमध्येच तर आम्ही दोघी जात होतो. येतांना मात्र सकाळचा रश अवर संपलेला असे. अगं पण, तुम्ही दोघी

जाणंयेणं करीत होता. त्यामुळे मला काळजी नव्हती. मग मी ह्यांना शब्द दिला. डोईजड व्हायला लागले तर मी जवळपास नोकरी शोधेन. सुरवातीला सहा महिने तीन डॉलर दर तासाला मिळत मग वाढत वाढत $५.५ वर दर तासांला झाला. मी अगदी हवेंत उडत होते. सुदैवाने आठ तासाचीच बांधिलकी. ४० तासापेक्षां जास्त केले तर म्हणे टाईम अँड ए हाफ मिळणार. ती भानगड कांही कळली नही. आणि ओव्हर टाईम करण्याचा विचारही मनाला शिवला नाही. फक्त डोक्यांत एकच. रश अवरमध्ये घरी यायला वेळ लागणार. घरी आले की आधी स्वयापाकघरांत पळायचे. हे घरी येईपर्यंत, ट डा स्वयंपाक तैय्यार है. अशी आरोळी द्यायची. त्यानंतर बाकीचा दिवस आपला. नो कॉल्स्, नो एमर्जन्सीज, नो नथींग. कोणाचे देणे नाही, घेणे नाही. परत वरून मला दर दोन आठवड्याला $ २४० चा माझा पहिला चेक होता. घरी आले आणि देवाजवळ चेक ठेवला. फक्त दहावीपर्यंत शिकले मी. नॉट बॅड हं ss. नाही तर हे? दर दोन आठवड्याला $ १५० चा चेक कसला त्याहून कमी. कारण टॅक्सेस कट् व्हायचे ना. नावांला पगार महिना तीनशे डॉलर. पण तो अंकल सॅम आहे ना. मेल्याची नजरच वाईट. एवढ्याशा पगारांत कसला हिस्सा घ्यायचा? आमचा घरखर्च भागेपर्यंत नाकी नऊ यायचे. हे बरेचदा म्हणायचे, बरं झालं सुरेखा तुला नोकरी लागली. आतां आपण आपल्यावर खर्च करीत जाऊ. तरी बरं अपार्टमेंटचे भाडे, टेलिफोनचा खर्च हॉस्पिटलच देई. मी घरी नाचतच पगार आणला. चला आपण टिव्ही घेऊ या ह्या महिन्यांत. भरपूर किस्से आहेत नोकरीचे, ते परत कधीतरी. हे म्हणाले, यंदा खूप खर्च आहेत, परत कधीतरी. मनांत उडणारे पंख मनांतच कापले. पण कां म्हणून विचारले नाही. कारण आईने तशी शिकवणच दिली नव्हती कधी. उलट वरुन पत्रांतून मलाच ऊपदेश द्यायची. सुरेखा, तू अजून लहान आहेस, जावईबापू खूप शिकलेले, उच्च विचाराचे आहेत, तू अजून बालीश आहेस, त्यांना उलट बोलू नकोस. त्यांना सहकार्य दे. असंच बरचं कांही लिहायची. ही माझी आई आहे की ह्यांची आई आहे? मग मला आईचाच राग येई. तरी बरं जावयाला आमच्या आईसाहेबांनी लग्नाच्या दोन तीन दिवसाच्या घाई गडबडीतच पाहिले. आणि मी कधीही कांही लिहील नाही. उगीच माझी माता माऊली काळजी करत बसेल. अर्थांत तसे लिहीण्यारखे पण काही नसे. पण अशा कांही गोष्टी घडल्या की त्या आईला लिहायला गेले तर मलाच ती वरुन म्हणेल, पहा, मी सांगितले नव्हते तुला. मग परत ती जावईपुराण सुरु करेल. नकोच लिहायला. पण आतां विषय निघाला म्हणून सांगते, (अरेरे ! आई हवी होती हे वाचायला. खूप आनंदली असती बिचारी).

भारतांतून अमेरिकेत येऊन दोन आठवडे पण झाले नसेतील. घरांत बसून कंटाळा आला होता. चार भिंतीत रहायची संवयच नाही. वयाची चौदा वर्षे आईच्या माहेरी, म्हणजे माझ्या आजोळी, सुप्रसीद्ध नामदेव चिवडेवालेंकडे मी राहिले होते. तीन मजली घर ते. एवढ्या मोठ्या घरांत ईनमीन चार जण रहायचो आम्ही. मी आजी, मामा आणि माझी मावस बहीण विजुमाई, जिची आई विजुमाई झाल्यावर लवकरच गेली. मावशी सासरी जायचा प्रश्नच आला नाही. कां ते सांगेन एखाद्यावेळेस. खरं म्हणजे मला माझ्या मामाशीच लग्न करायचे होते. कां तर? जन्मभर बाई म्हणजे आजीकडे रहायला मिळेल

म्हणून. तसा मामा माझ्यापेक्षां सात आठ वर्षांनीच मोठा. काय हरकत होती? पण तो नाही म्हणे. कार्टे, मी तुझा मामा म्हणजे वडिलांच्या ठिकाणी. एनीवे जे आपल्या ग्रपमध्ये आहेत सोलापूरचे त्यांना नवीपेठेतली चिवडेवाल्यांची बिल्डिंग नक्की माहीत असणार. ते जाऊ दे. सोलापूरच्या आठवणींबद्दल परत कधी तरी.

आज शनिवारचा दिवस. सकाळी हे राउंडस् मारुन आले ह्यांना सुट्टी होती तरीही. कालचे सर्जरी केलेले पेशंटस् पाहून येतो म्हणाले. मी कशाला जाता उगीच म्हटले. ए सीची ड्युटी आहे ना आज? अग, तो मला एक वर्ष ज्यनियर आहे. अहो, डॉ. कीम आहे कि थर्ड ईअरचा. कीमची आणि ह्यांची ड्युटी अल्टरनेट असायची. पण स्वारीने माझे वाक्य संपायच्या आंतच सुं ss बाल्या केलेला. मी मनाशी म्हटलं, जाऊन येऊ दे सगळे पेशंटस् पाहून. नाहीतर बाहेर गेल्यावरही एसीला नाही तर कीमला फोन करीत बसतील. आणि मला हे पूssर्ण हवे होते. नो शेअरिंग. मस्त कारमधून राईडला जायचे. बाहेर पिझ्झा की काय ते खाऊन येउ म्हणाले. मी पट्कन् तयार झाले म्हणजे काय तर बाहेर जायचे कपडे घातले एवढच. एवढ्या लवकर तयार पण झालीस? माझे मित्र म्हणतात त्यांच्या बायका दोन दोन तास लावतांत तयार व्हायला. दोन तास. तयार व्हायला? एकदां आंघोळ करतांना चेहरा धुतोच कि आपण. कपडे बदलले की संपलं तयार होणं. मग इतका वेळ कां लागतो तयार व्हयला? मला हे कोडं अजूनही सुटले नाहीय. आम्ही आमच्या ओल्डस् मोबील एफ् एटी फाईव्ह कारने बाहेर पडलो. अरे व्वा! किती मस्त वाटते आमच्या कारने म्हणायला असा विचार मनाशी चाटून गेला. मग आई आठवली, असा मोठेपणा गाजवणं बरं नाही सुरेखा. माणसाने कोंड्याचा मांडा करायला शिकलं पाहिजे. नाही त्यावेळी आई मला कां आठवते ऊगीच. पण माझी आई अशीच आहे. तिच्या मते स्त्रीचे जीवन म्हणजे एक त्यागच असायला पाहिजे. अशी कशी आपली आई? एनीवे, मी आईचा विचार बाजूला सारला. मला आज कार राईड एंजॉय करायची होती. कारमध्ये मी पॅसेंजर सीटवर आणि हे ड्रायव्हर्स सीटवर बसले. सीट बेल्ट कशी लावतांत ते दाखविले. आणि काय ! पट्कन् सीटबेल्ट लावता आली. मनातल्या मनांत मी सुखावले. माझीच पाठ थोपटली. ह्यांना काहीच म्हटलं नाही. आपले अज्ञान कशाला जगजाहीर करा उगीच? आम्ही मॅनहॅटनमध्ये ब्रीज घेऊन पोहोंचलो. लेक्सिंग्टन अॅवेन्युवर आलो. हे सारखे आरशांत पहात. माझ्या मनांत आलं, ईश्श्य ! कशांत काही नाही तरी हा गृहस्थ इतक्यांदा आरशांत पहातो? घरुन निघाल्यापासून पहातेय, सतत् आरशांत पहाणं? विचित्रच वाटले मला. मी पण मधूनच एकदोनदां आरसा माझ्याकडे वळविला आणि उगीचच केसांवरून हात फिरविला. चेहरा चेक् केला. सगळं तर ठीक आहे. पण हे लगेच आरसा स्वतःकडे वळवायचे. मला पण राग आला. मनाशी म्हटलं पहात बसा स्वतःचाच चेहरा ! मग परत मी आरसा माझ्याकडे वळविला नाही. आतां लग्न पण झालं आहे आपलं. मग कोणावर लाईन मारणार आहेत हे? असा विचार मनांत आला आणि माझ्या पायाखालची जमीन सरकली असे वाटले मला. पट्कन् एका दुकानासमोर ह्यांनी कार पार्क केली. तू कारमध्येच बस. मी आलोच इतक्यांत. झालं ! ह्यांची एखादी मॅडम तर येथे काम

करीत नसेल? मग कशाला धडपडायला आले भारतांत लग्न करायला ? आणि चक्क रडूच कोसळले. आमच्या आईसाहेब दत्त म्हणून हजर! सुरेखा, एवढा आतताईपणा बरा नाही बायकांच्या जातीला. तू अजून लहान आहेस. ते समंजस आहेत. तसं ते कांही करणार नाहीत. धीर धर जरा. प्रत्येक परिस्थितीला स्त्रीने सामना करायला शिकले पाहिजे. माझी आई पण ना ! कोणत्या मातीची बनली आहे देव जाणे. मी आईचा उपदेश मान्य करुन आलेल्या अश्रूंना माघारी पाठविले आणि मनाशी म्हटलं, खबरदार, परत आलांत तर ? दहा मिनीटांच्या आंतच हे परत कारकडे आले. माझा जीव भांड्यांत पडला. हातांत एक पॅकेट होते. माझ्याकडचा दरवाजा उघडला आणि समोरचे व्हायजर खाली करून त्याला आणलेला आरसा लावला. वरून " हा तुझा आरसा आणि तो माझा आरसा "! असं म्हणायला विसरले नाहीत. आईला सांगायला पाहिजे तिचा जांवई साधा आरसा पण शेअर करीत नाहीत म्हणून. आणि वरुन मलाच लिहीते, जावईबापू समंजस आहेत. तू लहान आहेस. आतां आईला लिहायला पाहिजे तिच्या समंजस जावयाबद्दल. जाऊ दे. नको लिहायला. बिचारी काळजी करीत बसेल माझीच. आई पण माझी जरा विचित्रच आहे. मला सांगते, ज्या गोष्टी आपल्या हातांत नाहीत त्याची माणसाने काळजी करु नये. वरुन स्वतः मात्र काळजी करीत बसणार. मी आईला म्हणे, आई काळजी करु नये म्हणतेस एकीकडे आणि दुसरीकडे सतत काळजी करीत असतेस. समजा काळजी नसेल तर नक्कीच तू एखादी काळजी शोधून काढशील. एनीवे. ह्यांनी माझ्यासाठी आणलेला आरसा लावला आणि परत ड्रायव्हर्स सीटवर जाऊन बसले, सीट बेल्ट लावला. आणि परत तेच. आरसा स्वतःकडे फिरवीला. आणि आरशांत पहात पहात कार डाव्या लेनमध्ये नेली. मी मनाशी म्हटलं, एवढे आरशांत घरी पण पहात नाहीत. वरुन म्हणणार माझ्यामध्ये पहाण्यासारखे काय आहे? तू कसं माझ्याशी लग्न केलंस? मी म्हणे, पुरे पुरे. पुरुषांचे कर्तुत्व महत्वाचे असते. तुम्ही सर्जन होणार म्हणून मी लग्न केले तुमच्याशी. इतर कोणत्याही स्पेशॅलटीमध्ये असतां तर लग्नच केले नसते मी तुमच्याशी. ह्याचे कारण परत कधीतरी. मग काय म्हणत होते मी. हं. आठवले. ह्यांनी त्या आरशाची महती सांगितली. ह्या आरशाला रेअर व्हयू मिरर् म्हणतात. लेन बदलतांना हा किती महत्वाचा वगैरे वगैरे. मी हो कां ? म्हटलं. शनिवारची ट्रॅफिक खूप होती. म्हणून हेही गपचूप आणि मी पण गपचूप. आपण उगीचच ह्यांच्यावर संशय घेतला. आपण आई म्हणते तसेच अल्लड आहोत. लहान आहोत. आतां तर मला मी किती बुद्दु आहे असे वाटायला लागले. मघाशी पायाखालची जमीन सरकली की काय असे वाटले होते. आतां वाटतयं, खरच जमीन सरकावी आणि धरणीमातेने सीतामाईला स्वतःच्या पोटांत घेतले तसे आपल्यालाही घ्यावे. पण मी साधी मानव. माझी कोठे एवढी लायकी ! आईचा हा लाडका जावईबापू खरंच खूप चांगला आहे. ( पाहू आणखी काही दिवस. असा विचार मनांत डोकावला आणि मी मनाशीच हंसले). मी माझ्या मनांतले ह्यांना काहीच सांगितले नाही. उगीच आपलं अज्ञान बाहेर नको पडायला. ह्यांचा भ्रम आहे की एवढ्या लहान वयांत मी किती हुशार, समंजस आहे ते. उगीचच ह्यांच्या भ्रमाचा हांडा कशाला फोडायचा ? असा मनांत विचार आला. आई म्हणते तेच बरोबर आहे. माझा नवरा खंरच गुणी आहे. आणि मी आजूबाजूचे निरीक्षण करायला

लागले. हे सगळे लोक कोठे जात असतील ? असा मनांत विचार आला. पण मी शहाण्या मुलीसारखी गप्प बसले. ठरविले होते, हे बोलायला लागले की मगच आपण बोलायचे. तोपर्यंत अळी मिळी गुप चिळी. गाडी पार्कवेवर कधी आली तेच कळले नाही. त्याचाही एक किस्सा आहे. सांगेन कधीतरी.

भारतांतून अमेरिकेत येऊन दोन महिनेच झाले असतील. नवलाईचे दिवस, हवेत उडण्याचे दिवस, पार संपून मी परत पृथ्वीवर आले होते. आईदादांची खूप आठवण येई. मन हेलावून जाई. वाटे आईच्या कुशीत जावे आणि भरपूर रडावे. पण कां रडावेसे वाटे ते मात्र कळत नव्हते. रडले की मन शांत होईल एवढेच वाटे. असेच हे नेहमीप्रमाणे घरी आले ड्युटी संपवून. मी बेडवर पडले होते. डोळे सुजलेले, हातांत आईचे पत्र. हे कपडे बदलून बेडमध्ये आले, आई जशी तिच्या पांखराला जवळ घेते तसे घेतले, माझ्या डोक्यावरुन हात फिरवीत आईचे आवडते गाणे म्हणायला सुरुवात केली. "गंगा यमुना डोळ्यांत उभ्या कां, ....झालं. माझा बांध फुटला. थोड्यावेळ मला रडू दिले. मग मी उगीचच तुला इकडे आणले कां असं विचारलं बिचाऱ्यांनी. नंतर म्हणाले ,तू झोप येथेच. मी जेवण गरम करुन आणतो. आज आपण मस्त बेडमध्येच जेवण करु. आयडिया कशी वाटली? मस्त रोमँटिक आयडिया आहे कि नाही? पहा, पहा कशी लाजून चुरर् झाली आहेस तु ! गाल पहा कसे गुलाबी झाले आहेत. आणि हे स्वयंपाकघराकडे पळाले. आई म्हणते तेच बरोबर आहे. नवरा क्षणाचा पती पण जन्मभराचा मायबाप असतो. आपण खरंच खूप लहान आहोत अजून, ह्याची पुरेपूर खात्री झाली माझी.

लीनता झोपली आहे तर त्याचा फायदा घ्यावा. म्हणून ब्रश करून मी घर छान झाडून, पुसून घेतले. दोन वर्षापूर्वी, मी जेव्हां भारतांतून नुकतीच आले होते तेव्हां शेजारची कॅथी नेहमी म्हणे, रोज कशाला घर झाडतेस? स्वच्छ तर आहे घर. मला तिचे म्हणणे कळत नसे. मी मनाशी विचार करे, मग घर घाण होईपर्यंत वाट पहायची कां ? आणि घर पोरोसे कसे ठेवायचे? आतां पारोसे म्हणजे काय हे कसे समजावयाचे हिला? इंग्रजीत पारोसे ह्या शब्दाचे भाषांतर कसे करायचे? तेही माहीत नाही. ह्यांना विचारावे तर आपलेच अज्ञान बाहेर पडणार. मग मी तिला उत्तर देई. आय एम् बोअर्ड. सो आय डु ईट. नाईस टाईमपास. ती म्हणे, तू टिव्ही घे विकत. मग छान टाईमपास होईल बघ तुझा. पण तिचे म्हणणे ऐकून मी गपचूप बसे. कारण आईच्या मते घरांतली खरकटी भांडी बाहेर धुवू नयेत.

घरांतील फर्निचर पुसतां पुसतां बाबूजींचे पत्र दिसले. आज ह्यांना फोनवर तरी सांगायचे नाहीतर घरी आल्यावर लगेच ह्यांच्या हातांत पत्र द्यायचे. मग विचार केला घरी आल्यावरच देऊ पत्र. बाबूजी म्हणजे ह्यांचे श्रध्दास्थान. ह्यांच्याकडून बाबूजी पुराण ऐकून ऐकून बाबूजी कधी माझे श्रध्दास्थान झाले ते कळलेच नाही. बाबूजींचे पत्र आले हे जर मी सांगितले फोनवर तर हे हवेतच उडायला लागतील. आणि मला तर हे मी जोपर्यंत जिवंत आहे तोपर्यंत तरी हे मला धरणीवर हवे आहेत. मग मनाशी विचार पक्का केला. ह्यांना आपण बोलूच द्यायचे नाही. सरळ दरवाजा उघडला कि हातांत

पत्र द्यायचे. आणि तसंच झालं. ह्यांनी पत्र पाहिलं आणि पत्रावर तुटून पडले.

दरवाजा उघडाच. दरवाज्यांतच पत्र वाचले सरसर. बाबूजींना आपण स्पाँसर करायचे. मग ते आपल्याकडे येतील. असं म्हणत म्हणत माझा हांत हातांत घेऊन गिरक्या मारायला लागले. मी म्हटलं, "अहो, अहो, लोक काय म्हणतील?" हे मला म्हणाले, "म्हणू देत". आणि चक्क नाचायला लागले लहान मुलांसारखे. लीनता झाली तेव्हां पण स्वारी खूष होण्याऐवजी काळजीतच होती. तिच्या भोवती गुंडाळलेले ब्लँकेट काढून आधी तिच्या हांतापायाची बोटं पाहिली, मग मोजली. मी म्हणलं, "अहो, सगळं ठीक आहे. मी ऑलरेडी चेक केलं". मग कोठे स्वारीचा चेहरा खुलला.

(क्रमशः)

**सुरेखा मद्दिवार**